म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ५३२
संग्रहालय. ठाणें.

# इतिहासाचें पत्रक.

विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां

महादाजी रामचंद्र साठे

स्कूलमास्तर जालगांव

यांनीं तयार करून

मुंबई येथें

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिलें.

सन १८८२ इसवी.

# महाराष्ट्र देशाचे इतिहासाचें पत्रक.

**इसवी सनाचे पहिले शतकांत**— शालिवाहन नामक शककर्ता राजा झाला. त्याची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) हें शहर. त्याचा शक इसवी सनानंतर ७८½ वर्षांनीं चालू झाला. त्यास शालिवाहन शक ह्मणतात.

पुढें इसवी सन १२०० पर्यंत सदहू इतिहासाविषयीं भरंवसा ठेवण्यासारखी अशी दुसरी कांहीं माहिती कळत नाहीं.

१३०० चे सुमारास (चवदावें शतकांत) अल्लाउद्दीन खिलजी नामक मुसलमान सरदारानें नर्मदेच्या दक्षिणेस प्रथम स्वारी करून देवगड (दौलताबाद) येथील रामदेवराव जाधव ह्या हिंदु राजाचा पराभव केला व त्याचें सर्व द्रव्य नेलें. नंतर दिल्लीच्या पठाण राजांच्या सैन्यानीं दक्षिण देश जिंकिला व लुटला.

१३४७ दिल्लीचा बादशाहा महमद तघलख ह्याच्या दक्षिणेंतील सरदारांनीं बंड करून ब्राह्मणी राज्याची स्थापना केली. आणि आपल्यापैकींच जाफरखान ह्यास अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी असें नाव ठेवून दौलताबादेस गादीवर बसविलें.

१३९६ दुर्गादेवी नांवाचा मोठा दुष्काळ पडला. तो बारा वर्षें पर्यंत होता.

१४७८ ब्राह्मणी राज्य अमर्याद वाढल्यामुळें त्यांतील सुभेदारच बादशाहाची आज्ञा मानीतनासे झाले ह्मणून त्यास उतरती कळा लागली.

१४९७ पोर्तुगाल देशाचा वास्कोदि गामा सरदार कांहीं लोकांसह जलमार्गानें प्रथम कालिकोट बंदरांत आला.

१५०० सुमारास ब्राह्मणी राज्य मोडून १ विजापुर (ह्दिलशाही), २ गोंवळकोंडें (कुतुबशाही), ३ अहमदनगर (निजामशाही), ४ वऱ्हाड (अमादशाही) व ५ बेदर (बरीदशाही) अशीं पांच राज्यें झालीं.

१५१० वास्कोदि गाम्यानें गोंवें शहर आपले ताब्यांत घेतलें.

१५१२ अमादशाही स्थापन झाली.

१६०० सुमारास दिल्लीचा बादशाहा अकबर ह्यानें विजापुर, गोंवळकोंडें आणि अहमदनगर हीं तीन राज्यें बुडविण्याचें मनांत आणून प्रथम निजामशाहींत शिरून अहमदनगर हस्तगत करून, बादशाहासही कैद केलें.

१६२६ निजामशाहींतला बुद्धिमान प्रधान मलिकंबर मरण पावला.

१६२७ शिवाजी राजा जुन्नराजवळ शिवनेरी किल्ल्यांत जन्मला.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ठाणे

१६३७ दिल्लीचा बादशाह शाहाजहान यानें निजामशाही राज्य बुडविलें.

१६४६ शिवाजीनें विजापूरकरांच्या ताब्यांतील तोरणा किल्ला तेथील लोक वश करून घेऊन आपले ताब्यांत घेतला.

१६४७ शिवाजीचा गुरु दादोजी कोंडदेव वारला. व पुढें थोडक्यांच दिवसांत शिवाजीनें चाकण, पुरंदर, कोंडाणें (सिंहगड) हे किल्ले लढाई खेरीज केवळ शहाणपणानेंच घेतले. व सुपें परगणा तेथील मामलेदारावर छापा घालून घेतला.

१६४८ शिवाजीनें कल्याणचा सुभा व कोंकणपट्टींतील बरेच किल्ले घेतले.

१६५६ शिवाजीनें शामराजपंत ब्राह्मणास पेशवाईचें पद देऊन कोंकणपट्टी हस्तगत करण्याकरितां जंजिऱ्याच्या शिद्दीवर पाठविलें. तेथें त्याचा पराभव झाल्यामुळें त्याचे जागीं मोरोपंत पिंगळ्यास नेमून पुनः शिद्दीवर पाठविलें.

१६५९ विजापुराहून अफझूलखान शिवाजीच्या पारिपत्यास आला. त्यास प्रतापगडाजवळ शिवाजीनें मसलत करण्याचा घाट घालून कपटानें पोटांत वाघनखें खुपसून ठार मारिलें.

१६६० अफझूलखान मेला असें समजतांच विजापुराहून रुस्तुमजखान आला. त्याचा मोड करून त्यास पळविलें. विजापुरापर्यंत मुलखाची खंडणी घेतली. कोंकणांतील दाभोळ शहर लुटिलें तेव्हां बादशाहानें शिद्दी जोहार नामें सरदार पाठविला. त्यानें शिवाजीस पन्हाळा किल्ल्यावर चार महिने कोंडिलें; परंतु शिवाजीनें तह करण्याच्या मिषानें त्यास फसविलें व तेथून पळाला.

१६६१ पोर्तुगिसांनीं मुंबई बेट इंग्रजांस दिलें.

१६६२ शिवाजीनें विजापूरकरांचें कांहीं किल्ले व सावंताचा वाडी प्रांत घेतला. तेव्हां हा आटोपत नाहीं असें पाहून विजापूरकरानीं त्याशीं तह केला. पुढें शिवाजीनें दिल्लीचे बादशाहाचे मुलखांत स्वाऱ्या करून अवरंगाबादपर्यंत मुलूख लुटून पुष्कळ द्रव्य मिळविलें. तेव्हां बादशाहानें षाहिस्तेखान हा पारिपत्यास पाठविला. त्यास शिवाजीनें हाकून लाविलें.

१६६४ शिवाजीनें सुरत लुटिली. त्याचा बाप शाहाजी मरण पावला. शिवाजीनें आपले नांवास राजा हा किताब जोडून आपले नांवाचें नाणें पाडण्याकरितां टांकसाळ घातली.

१६६५ शिवाजीनें मलबार किनाऱ्यावरील बारसिलोर शहर लुटून अपार द्रव्य मिळविलें व त्याच्या गलबतावरच्या लोकांनीं मक्केस जाणारे मुसलमान यात्रे-

# महाराष्ट्र देशाचे इतिहासाचें पत्रक.

**इसवी सनाचे पहिले शतकांत**— शालिवाहन नामक शककर्ता राजा झाला. त्याची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) हें शहर. त्याचा शक इसवी सनानंतर ७८$\frac{1}{2}$ वर्षांनीं चालू झाला. त्यास शालिवाहन शक ह्मणतात.

पुढें इसवी सन १२०० पर्यंत सदर्हू इतिहासाविषयीं भरंवसा ठेवण्यासारखी अशी दुसरी कांहीं माहिती कळत नाहीं.

१३०० चे सुमारास (चवदाशें शतकांत) अल्लाउद्दीन खिलजी नामक मुसलमान सरदारानें नर्मदेच्या दक्षिणेस प्रथम स्वारी करून देवगड (दौलताबाद) येथील रामदेवराव जाधव ह्या हिंदु राजाचा पराभव केला व त्याचें सर्व द्रव्य नेलें. नंतर दिल्लीच्या पठाण राजांच्या सैन्यानीं दक्षिण देश जिंकिला व लुटला.

१३४७ दिल्लीचा बादशाहा महमद तघलख ह्याच्या दक्षिणेंतील सरदारांनीं बंड करून ब्राह्मणी राज्याची स्थापना केली. आणि आपल्यापैकींच जाफरखान ह्यास अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी असें नांव ठेवून दौलताबादेस गादीवर बसविलें

१३९६ दुर्गादेवी नांवाचा मोठा दुष्काळ पडला, तो बारा वर्षें पर्यंत होता.

१४७८ ब्राह्मणी राज्य अमर्याद वाढल्यामुळें त्यांतील सुभेदारच बादशाहाची आज्ञा मानीतनासे झाले ह्मणून त्यास उतरती कळा लागली.

१४९७ पोर्तुगाल देशाचा वास्कोदि गामा सरदार कांहीं लोकांसह जलमार्गानें प्रथम कालिकोट बंदरांत आला.

१५०० सुमारास ब्राह्मणी राज्य मोडून १ विजापुर (इादिलशाही), २ गोंवळकोंडें (कुतुबशाही), ३ अहमदनगर (निजामशाही), ४ वऱ्हाड (अमादशाही) व ५ बेदर (बरीदशाही) अशीं पांच राज्यें झालीं.

१५१० वास्कोदि गाम्यानें गोवें शहर आपले ताब्यांत घेतलें.

१५१२ अमादशाही स्थापन झाली.

१६०० सुमारास दिल्लीचा बादशाहा अकबर ह्यानें विजापुर, गोंवळकोंडें आणि अहमदनगर हीं तीन राज्यें बुडविण्याचें मनांत आणून प्रथम निजामशाहींत शिरून अहमदनगर हस्तगत करून, बादशाहासही कैद केलें.

१६२६ निजामशाहींतला बुद्धिमान प्रधान मलिकंबर मरण पावला.

१६२७ शिवाजी राजा जुन्नराजवळ शिवनेरी किल्ल्यांत जन्मला.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ठाणें



१६३७ दिल्लीचा बादशाह शाहाजहान ह्यानें निजामशाही राज्य बुडविलें.

१६४६ शिवाजीनें विजापुरकरांच्या ताब्यांतील तोरणा किल्ला तेथील लोक वश करून घेऊन आपले ताब्यांत घेतला.

१६४७ शिवाजीचा गुरु दादोजी कोंडदेव वारला. व पुढें थोडक्याच दिवसांत शिवाजीनें चाकण, पुरंदर, कोंडाणें (सिंहगड) हे किल्ले लढाई खेरीज केवळ शहाणपणानेंच घेतले. व सुपें परगणा तेथील मामलेदारावर छापा घालून घेतला.

१६४८ शिवाजीनें कल्याणचा सुभा व कोंकणपट्टींतील बरेच किल्ले घेतले.

१६५६ शिवाजीनें शामराजपंत ब्राह्मणास पेशवाईचें पद देऊन कोंकणपट्टी हस्तगत करण्याकरितां जंजिऱ्याच्या शिद्दीवर पाठविलें. तेथें त्याचा पराभव झाल्यामुळें त्याचे जागीं मोरोपंत पिंगळ्यास नेमून पुनः शिद्दीवर पाठविलें.

१६५९ विजापुराहून अफझूलखान शिवाजीच्या पारिपत्यास आला. त्यास प्रतापगडाजवळ शिवाजीनें मसलत करण्याचा घाट घालून कपटानें पोटांत वाघनखें खुपसून ठार मारिलें.

१६६० अफझूलखान मेला असें समजतांच विजापुराहून रुस्तुमजखान आला. त्याचा मोड करून त्यास पळविलें. विजापुरापर्यंत मुलखाची खंडणी घेतली. कोंकणांतील दाभोळ शहर लुटिलें तेव्हां बादशाहानें शिद्दी जोहार नामें सरदार पाठविला. त्यानें शिवाजीस पन्हाळा किल्ल्यावर चार महिने कोंडिलें; परंतु शिवाजीनें तह करण्याच्या मिषानें त्यास फसविलें व तेथून पळाला.

१६६१ पोर्तुगिसांनीं मुंबई बेट इंग्रजास दिलें.

१६६२ शिवाजीनें विजापूरकरांचें कांहीं किल्ले व सांवताचा वाडी प्रांत घेतला. तेव्हां हा आटोपत नाहीं असें पाहून विजापूरकरांनीं त्याशीं तह केला. पुढें शिवाजीनें दिल्लीचे बादशाहाचे मुलखांत स्वाऱ्या करून अवरंगाबादपर्यंत मुलूख लुटून पुष्कळ द्रव्य मिळविलें. तेव्हां बादशाहानें षाहिस्तेखान हा पारिपत्यास पाठविला. त्यास शिवाजीनें हांकून लाविलें.

१६६४ शिवाजीनें सुरत लुटिली. त्याचा बाप शाहाजी मरण पावला. शिवाजीनें आपले नांवास राजा हा किताब जोडून आपले नांवाचें नाणें पाडण्याकरितां टांकसाळ घातली.

१६६५ शिवाजीनें मलबार किनाऱ्यावरील बारसिलोर शहर लुटून अपार द्रव्य मिळविलें व त्याच्या गलबतावरच्या लोकांनीं मक्केस जाणारे मुसलमान यात्रे-

करून लुटिले. तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें दिल्लिरखान व जयसिंग हे दोन पराक्रमी सरदार पारिपत्यास पाठविले; शिवाजीनें निरुपाय जाणून कांहीं जहागिरी घेऊन बादशाहाची चाकरी करण्याचें पत्करिलें व विजापूरकराच्या कांहीं मुलूखाची चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क मिळविण्याविषयीं बादशाहाचें वचन घेऊन वरील दोन सरदारांस विजापूरचे बादशाहाशीं युद्ध करण्यास कुमक करून जय मिळविला.

१६६६ शिवाजी आपला मुलगा संभाजी यासह दिल्लीच्या बादशाहास भेटावयास गेला. त्यास बादशाहानें प्रतिबंधांत ठेविलें असतां त्यास फसवून पळाला.

१६६७ शिवाजी निष्टून आल्यानें अवरंगजेबास फार वाईट वाटलें. तेव्हां बाह्यात्कारें कृपा दाखवून प्रसंग येईल तेव्हां दगा करावा अशा हेतूनें त्याचे विनंतीवरून त्यास राजा हा किताब देऊन वऱ्हाडांत कांहीं जहागिरी दिली.

१६७० शिवाजी हा एखादेवेळीं घात करील असें भय पावून अवरंगजेबानें दक्षिणेंतील सुभेदार सुलतान माजूम ह्यास त्याला पकडण्याविषयीं हुकूम केला. हें कळतांच शिवाजीनें तान्हाजी मालुसऱ्यास पाठवन सिंहगड परत घेतला. त्या लढाईंत तान्हाजी मेला. मग पुरंदर वगैरे दुसरे किल्ले घेऊन पुन्हा सुरत लुटिली. व पाठीस लागलेल्या मोंगल सैन्याची दाणादाण केली. दिल्लीचा सुभा जो खानदेश त्यांत प्रतापराव गुजरास पाठवून चौथाई हा हक्क बसविला.

१६७२ मोहबतखानास अवरंगजेबानें पाठविलें. त्याचा प्रतापरावानें पराभव केला. ह्या वर्षापासून मराठे मोंगलांकडून वरील हक्क दरसाल घेऊं लागले.

१६७३ शिवाजीनें विजापूरकरांचें संपत्तीनें भरपूर असें जें हुबळी शहर तें लुटिलें. व त्यांचे सातारा व अजीमतारा वगैरे किल्ले घेतले. आणि पारिपत्यास आलेल्या लष्करास गुजरानें पिटवून लाविलें. परंतु पुन्हा लुटण्याकरितां हल्ला करीत असतां गुजर मेला. तेव्हां हंबीरराव मोहित्यानें त्या लष्कराचा पराभव केल्यामुळें तो सेनापति झाला.

१६७४ जून महिन्याचे ६ वे तारखेस शिवाजीस राजगडावर राज्याभिषेक झाला.

१६७७ शिवाजीनें तीस हजार स्वार व चाळीस हजार पायदळ घेऊन विजापूरकरांच्या कर्नाटक प्रांतांत शिरून दोन हक्क वसूल केले व कांहीं मुलूख मिळविला. त्याचा भाऊ व्यंकोजी ह्यानें शिवाजीवर कपटानें छापा घातला असतां त्याचाच पराभव झाला.

१६७९ अवरंगजेबानें विजापूरचें राज्य बुडविण्यास दिल्लिरखानास पाठविलें

तेव्हां विजापूरकरांस मदत करून शिवाजीनें खानाचा पराभव करून करनाटक व दुसरे प्रांत आपल्या पूर्ण ताब्यांत घेतले.

१६८० शिवाजी रायगडावर गुडघी रोगानें आपले वयाचे ५२ वे वर्षी वारला. व वडील पुत्र संभाजी हा २२ वर्षांचा असतां गादीवर बसला.

१६८३ अवरंगजेब मोठ्या फौजेनिशीं दक्षिण देश घेण्यास आला.

१६८७ अवरंगजेबानें विजापूर व गोंवळकोंडें हीं राज्यें मोडिलीं. ह्मणजे बादशाही केली.

१६८९ संभाजी दुर्व्यसनी असून गैरसावधपणानें वागूं लागल्यामुळें शेवटीं अवरंगजेबानें त्याच्या कलुशा प्रधानासह त्यास धरून कैद केलें. कैदेंत असतां बादशाहास कांहीं लावून बोलल्यामुळें तुळापुरास हालहाल करून मारविलें व त्याची बायको येसूबाई आणि पुत्र शिवाजी ह्यांस कैदेंत ठेविलें ह्यामुळें त्याचा सावत्र बंधू राजाराम तो राजा झाला. राजाराम ११ वर्षें राज्य करून मरण पावला व त्याचा मुलगा शिवाजी १० वर्षांचा असतां त्यास राजा करून राजारामाची वडील बायको ताराबाई हिनें राज्यकारभार चालविला.

१७०७ फेब्रुवारीच्या २१ वे तारखेस अवरंगजेब अहमदनगरास मेला.

१७०८ अवरंगजेबाचा पुत्र आजिमशाहा ह्यानें शिवाजीस (शाहूस) त्याचे भाई सुद्धां सोडून दिलें. त्यानें ताराबाईचा पराभव करून साताराची गादी आपले वयाचे २४ वे वर्षी मिळविली.

१७०९ ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी ह्यांनीं कोल्हापुराजवळचा पन्हाळा किल्ला घेऊन कोल्हापुर येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें.

१७१४ शाहूचा पेशवा बहिरोपंत पिंगळा आंग्र्यावर गेला होता. तेथें आंग्र्यानें त्यास कैद केलें. त्यास सोडविण्याकरितां शाहूनें बाळाजी विश्वनाथास पाठविलें. व इच्छेप्रमाणें झाल्यावर त्यास पेशवाईचा अधिकार दिला. व रामचंद्रपंत भानूस फडनवीस केलें.

१७२० बाळाजी विश्वनाथ ६ वर्षें पेशवाईचें काम करून सासवड येथें मेला.

१७२१ एप्रिल महिन्याच्या सुमारास ह्मणजे बाळाजी मेल्यानंतर सुमारें सात महिन्यांनीं पेशवाईचीं वस्त्रें शाहूनें बाजीरावास दिलीं.

१७२४ बाजीरावानें त्याच्या पारिपत्यास आलेल्या माळव्यातील सरदारास व बऱ्हाणपूरच्या सुभेदारास जिंकिलें.

१७२६–२७ अनुक्रमें माळव्यांत बाजीरावानें आणखीं दोन स्वाऱ्या करून पुष्कळ द्रव्य लुटून आणलें.

१७२८ हैदराबादेच्या निजाम उल्मुलखानें शाहू व कोल्हापूरचा राजा संभाजी ह्यांच्यामध्यें तंटा उत्पन्न केल्यावरून बाजीरावानें शाहूच्या परवानगीनें निजामावर स्वारी करून त्याचा पराभव केला. तेव्हां निजामानें मराठ्यांशीं तह केला.

१७३१ सेनापति त्र्यंबकराव दाभाडा व बाजीराव ह्या उभयतांमध्यें बडोदें व डुभोई ह्यांच्यामध्यें लढाई होऊन बाजीरावानें दाभाड्यास ठार मारिलें.

१७३३ बुंदेलखंडचा राजा छत्रसाल ह्यास माळव्यांतील मोंगलांच्या अधिकाऱ्याचा पराभव करण्याकरितां बाजीरावानें मदत करून त्याचेकडून झांशीजवळ सवादोन लक्षांचा मुलूख जहागिरि मिळविला.

१७३५ जंजिऱ्याचा मुख्य अधिकारी शिद्दी याकूट मरून त्याच्या मुलांमध्यें गादीसाठीं तंटा लागला. तेव्हां शाहूच्या सांगण्यावरून बाजीरावानें दुसऱ्या मुलाचा पराभव करून रहिमानास गादीवर बसविलें. ह्याबद्दल मराठ्यांस त्याचे राज्यांतील अकरा महालांचें अर्धें उत्पन्न, व रायगड, तळें, घोसाळें, उचितगड, बिरवाडी हे किल्ले मिळाले. त्यांचा सर्व अधिकार शाहूनें बाजीरावास दिला.

१७३६ बाजीराव दिल्लीच्या बादशाहाशीं फार मुलूख मागूं लागला. ह्मणून त्यानें त्याचे पारिपत्याचा बेत केला. बाजीरावानें मोठा पराक्रम करून फौजेसुद्धां थेट दिल्लीच्या दरवाज्या पर्यंत जाऊन तेथेंही मोंगलांचा पराभव केला व इच्छेप्रमाणें तह करून सल्ला केला.

१७३७ कोंकणांत पोर्टुगीज व मानाजी आंग्रे ह्यांचा तंटा झाला. तेव्हां शाहूचे आज्ञेनें बाजीरावानें पोर्टुगीसांचा पराभव करून साष्टी वगैरे किल्ले घेतले.

१७३८ बाजीरावानें हिंदुस्थानांत जाऊन निजाम उल्मुलुख ह्यास जेर करून असा तह करून घेतला कीं सारा माळवा प्रांत, नर्मदा आणि चंबळा ह्या नद्यांच्या मधला मुलूख ह्यांचें पूर्ण आधिपत्य व स्वारीच्या खर्चाबद्दल ५० लाख रुपये इतकें बादशाहाकडून देववावें.

१७३९ वसईच्या किल्ल्यास चिमणाजी आपानें वेढा घातला; व मोठ्या पराक्रमानें पोर्टुगीजांचा पराभव करून तो घेतला. इराणचा बादशाहा नादिरशाहा ह्यानें दिल्लीवर स्वारी करून बादशाहास कैद केलें. व शहर लुटलें. आणि ७० कोट रु-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

प्रये जमा केले. दहा हजार लोक मारिले व पुन्हा बादशाहास स्वतंत्रपणें तक्तावर बसवून इराणास निघून गेला.

१७४० बाजीराव २० वर्षें पेशवाईचें काम करून नर्मदेच्या काठीं मेला. तेव्हां रघोजी भोंसल्यानें बाबुजी नाईक बारामतीकर ह्यास पेशवाई मिळण्याची पुष्कळ खटपट केली. तरी ती त्यास न मिळतां बाजीरावाचा वडील पुत्र नानासाहेब ह्यास मिळाली. वरील कृत्यामुळें रघोजीचें व नानासाहेबाचें जें वांकडें आलें तें शाहूनें मिटविलें.

१७४८ काबूल व पश्चिम इराणचा बादशाहा अहमदशाहा अबदाली ह्यानें पंजाब प्रांत आपले ताब्यांत घेऊन दिल्ली पर्यंत स्वारी केली. त्यास दिल्लीच्या बादशाहानें आपला पुत्र अमेदशाहा यास पाठवून काबूलापर्यंत मागें हटविलें— निजाम उल्मुलूख १०४ वर्षांचा होऊन मेला.

१७४९ शाहू राजा कैदेंतून सुटल्यावर ४२ वर्षांनीं आपले वयाचे ६६ वे वर्षीं निपुत्रीक मेला. त्यानें नानासाहेब पेशव्यास अशी सनद दिली कीं माझे मागें ताराबाईचा नातू रामराजा ह्यास दत्तक घेऊन गादीवर बसवावें आणि शिवाजीचे वंशजाचा सन्मान मात्र राखून तुह्मीं संपूर्ण राज्यकारभार चालवावा. त्याप्रमाणें ताराबाईचा नातू रामराजा राजा केला. तेव्हांपासून ते नांवाचे मात्र राजे झाले.

१७५० साताराचे सर्व जहागिरदार पुण्यास आणून तेथेंच सर्व राज्यकारभार सुरू झाला. तेव्हांपासून पुणें मराठी राज्याची राजधानी झाली.

१७५१ हैदराबादचे गादीवर निजाम उल्मुलुखाचा पुत्र सलाबत्जंग हा बसला.

१७५३ नानासाहेबानें स्वत: करनाटकांत स्वारी करून तेथची व श्रीरंगपट्टणची खंडणी घेऊन जवळचा हुळी नामक किल्ला घेतला.

१७५५ रघुनाथरावास गुजराथेंत स्वारीस पाठविलें. त्यानें दमाजी गाइकवाडाचे मदतीनें अमदाबादेपर्यंत खंडणी घेतली. व मोठी लढाई करून एप्रिल महिन्यांत अमदाबाद पुरतेपणीं आपले ताब्यांत घेतली. नंतर परत आला. आंग्र्या फारच चांचेपणा करूं लागल्यामुळें नानासाहेबानें लढाऊ गलबतें तयार करून इंग्रजांच्या मदतीनें त्याचे समुद्रकिनाऱ्यावरचे विजयदुर्ग वगैरे किल्ले घेतले. आणि या मदतीबद्दल इंग्रजांस बाणकोट व त्याचे भोंवतालचे नऊ गांव दिले.

१७५८ रघुनाथरावानें पंजाबांत जाऊन तेथील गिलच्यांच्या सुभेदारास हांकून लाविलें. आणि मुलतान व लाहोर येथें आपला अम्मल बसविला.

१७६० अहमदनगर शहर दगाबाजीनें पेशव्याचे ताब्यांत आलें. हें निजामअली

व त्याचा भाऊ सलाबतजंग ह्यास कळतांच युद्धाची तयारी केली. तेव्हां भाऊसाहेबानें हिंदुस्थानांत जाण्याचा बेत रहित केला. दोघांची ऊदगीर येथें गांठ पडून मोठी लढाई झाली. मोंगलांचा अगदीं पराभव होऊन निजामानें तह केला. त्यांत पेशव्यांस ६२ लक्षांपेक्षां जास्त उत्पन्नाचा मुलूख मिळाला. आपले सुभेदारास हाकून दिलें हें अबदालीस समजतांच त्यानें पंजाबांत येऊन लाहोरांतील पेशव्यांचे लोकांस हाकून देऊन त्यांच्या मदतीस आलेल्या दत्तोजी शिंद्यास ठार मारिलें. तेव्हां पेशव्यानें आपला भाऊ सदाशिवराव व पुत्र विश्वासराव ह्यांचेबरोबर मोठें सैन्य देऊन त्यावर पाठविलें. त्यांनीं जाऊन दिल्ली घेतली.

१७६१ जानेवारी तारीख ७ रोजीं सोनपत पानपत येथें गिलचे व पेशवे ह्यांच्यामध्यें मोठें घोर युद्ध झालें. त्यांत पेशव्यांचा पराभव होऊन सुमारें दोन लक्ष मनुष्यें मेलीं. हें वर्तमान समजून नानासाहेब फार दुःखी होत्साता पुण्याजवळ पर्वतीच्या देवळांत जून अखेर मृत्यु पावला. व सप्टेंबरचे अखेरीस त्याचा पुत्र माधवराव १७ वर्षांचा असतां त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. नानानें २१ वर्षे पेशवाईचें काम केलें.

१७६२ सलाबत्‌जंगाचा भाऊ निजामअल्ली ह्यानें त्यास कैद करून गादी बळकाविली.

१७६३ सलाबत्‌जंगास निजामअल्लीनें ठार मारिलें.

१७७२ नोवेंबर तारीख १८—माधवराव ११ वर्षे पेशवाईचें काम करून थेऊर येथें आपले वयाचे २८ वे वर्षी मरण पावला. व त्याचा भाऊ नारायणराव हा १७ वर्षांचा असतां त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

१७७३ आगष्ट— नारायणरावानें सुमारें ८ महिने पेशवाईचें काम केल्यावर रघुनाथरावाच्या सुमेरसिंग वगैरे मारेकऱ्यांच्या हातून मरण पावला. तेव्हां रघुनाथरावास पेशवाईचा अधिकार मिळाला.

१७७४ अप्रील मध्यें नारायणरावाचा पुत्र सवाई माधवराव पुरंदरास जन्मला. पुढें ४० दिवसांनीं त्यास सातान्याहून पेशवाईचीं वस्त्रें आलीं. व रघुनाथराव पदच्युत झाला.

१७७६ इंग्लिश व पेशवे ह्यांच्यामध्यें पुरंदरचा तह झाला. तो असा—साष्टी बेट इंग्रजांकडे रहावें. व त्यांनीं रघुनाथरावाचा पक्ष सोडावा.

१७७६ थोरले माधवरावाचे वेळीं सदोबा नांवाचा कनोजा ब्राह्मण, पानप-

तच्या लढाईंत नाहींसा झालेला सदाशिवराव भाऊ तो मींच असें ह्मणूं लागला. पण तो खोटा ठरून रत्नागिरीस कैदेंत होता. त्यास तेथील सुभेदार रामचंद्र नाईक ह्यानें सोडल्यावरून त्याणें बंड केलें. शेवटीं त्यास पकडून पुणें एथें हत्तीचे पायीं बांधून ठार मारविलें.

१७७७ रामराजा निपुत्रीक मेला. सबब शिवाजीच्या पणज्याच्या वंशांतील कोणी पुरुष दत्तक देऊन त्याचें नांव दुसरे शाहू महाराज ठेवून गादीवर बसविलें.

१७७९ जानेवारी तारीख १२–वडगांवास इंग्रज व पेशवे ह्यांची लढाई होऊन इंग्रजांचा पराभव झाला.

१७८४ पेशव्याच्या ह्मणण्याप्रमाणें रघुनाथराव कोपरगांवीं असतां मृत्यु पावला.

१७९२ पेशवे, निजामअल्ली व इंग्रज आणि टिपू ह्यांच्यामध्यें श्रीरंगपट्टणचा तह झाला तो असा–टिपूनें आपलें अर्धें राज्य व १६५ लक्ष रुपये रोख ह्या तिघांस द्यावे. व तेथपर्यंत दोन पुत्र ओलीस द्यावे.

१७९४ फेब्रुवारी तारीख १२–महादजी शिंदा पेशव्यानें आपले मत्तानें वागावें ह्मणून यत्न करीत असतां पुण्याजवळ वानवडीस मोठा ज्वर येऊन मेला. तो निपुत्रीक होता ह्मणून त्याच्या भावाचा नातू दौलतराव शिंदा हा राज्यकारभार करूं लागला.

१७९५ तारीख ११ मार्च–निजामाकडे खंडणी थकली ह्मणून त्याच्या पारिपत्याकरितां मराठे तिकडे गेले. उभयतांची खर्ड्याजवळ गांठ पडून लढाई झाली. त्यांत मराठ्यांचा जय होऊन निजामानें पेशव्यांची बाकी तीन कोट रुपये, स्वारीचा खर्च, कांहीं मुलूख व आपला कारभारी मशीर उल्मुलुख इतकें पेशव्यांचे ताब्यांत द्यावें असा तह ठरला. सवाई माधवराव परतंत्रतेस कंटाळून अक्टोबरच्या २२ वे तारखेस दसऱ्याचे दिवशीं आपले वाड्याचे तिसऱ्या मजल्यावरून कारंजावर उडी टाकून तिसरे दिवशीं मरण पावला.

१७९६ सवाई माधवरावाच्या मागें त्याच्या बायकोस दत्तक देऊन त्यास गादीवर बसविण्याचें नानानें ठरविलें. पण बाजीरावानें शिंद्याचा कारभारी बाळोबा तात्या याचे द्वारें गादीबद्दल उद्योग चालविला. तेव्हां नानानें आपल्यास मुख्य कारभारी करण्याचें वचन घेऊन बाजीरावास गादीवर बसविण्याची तयारी केली. ह्मणून बाळोबास राग येऊन बाजीरावास कैद करून त्याचा धाकटा भाऊ चिमणाजी आपा यास मे महिन्यांत गादीवर बसविलें. पुढें नानानें शिंद्यास वश करून बाळोबास कैद

करून डिसेंबरांत बाजीरावास गादीवर बसविलें. व आपण मुख्य कारभारी झाला.

१७९७ डिसेंबर तारीख ३१–बाजीरावानें शिंद्याकडून नाना फडनविसास कैद करविलें. व त्याचे पक्षाचे लोकांचीं घरें लुटविलीं.

१७९८ शिंद्याचें व पेशव्याचें वांकडें येऊन शिंद्यानें नानास सोडिलें. तेव्हां बाजीरावानें त्यास मोठ्या सन्मानानें पुण्यास आणून अक्टोबरच्या १५ व्या तारखेस मुख्य कारभारी केलें.

१८०० मार्च तारीख १३, नाना फडनवीस मेला.

१८०२ बाजीरावानें विठोजी होळकर यास मारिलें ह्मणून त्याचा भाऊ यशवंतराव ह्यानें पुण्यास येऊन बाजीरावाचा अगदीं मोड केला. तेव्हां बाजीराव पळून गेला. मग होळकरानें अमृतरावाचा पुत्र विनायकराव ह्यास गादीवर बसविलें. बाजीरावानें तारीख ३१ डिसेंबर रोजीं इंग्लिशांशीं वसई मुक्कामीं तह केला तो असा–बाजीरावानें इंग्लिशांचें ८ हजार सैन्य शत्रूच्या निवारणार्थ आपलेजवळ ठेवावें. व त्याचे खर्चाकरितां २० लक्षांचा मुलूख इंग्लिशांस द्यावा.

१८०३ यशवंतराव होळकर पुणें लुटून परत गेला. मेच्या १३ वे तारखेस इंग्लिशांनीं बाजीरावास गादीवर बसविलें. विनायकरावास नेमणूक देऊन काशीस ठेविलें. व इंग्रजांचें सैन्य तहाप्रमाणें घोडनदीस येऊन राहिलें.

१८०८ शाहू महाराज मेले व त्यांचा वडील पुत्र प्रतापसिंह गादीवर बसला.

१८१५ गायकवाडाकडून खंडणीचें वगैरे बोलणें बोलण्याकरितां आलेला वकील गंगाधर शास्त्री ह्यास बाजीरावानें त्र्यंबकजी डेंगळ्याच्या हातून पंढरपुरास मारविलें.

१८१७ मे तारीख १० रोजीं इंग्लिशांचा व बाजीरावाचा नवीन तह झाला. त्यांत पेशव्याचें पुष्कळ अंशीं स्वातंत्र्य कमी झालें. तारीख ५ नोवेंबर रोजीं बापू गोखल्यानें इंग्लिशांच्या फौजेवर खडकी येथें हल्ला केला. त्यांत पेशव्यांचा पराभव होऊन बाजीराव पळाला. पुढें त्याची व घोडनदीहून येणाऱ्या इंग्रजी लष्कराची कोरेगांवास गांठ पडून मोठी निकराची लढाई झाली. त्यांत इंग्लिशांची फौज थोडी असूनांहि त्यांचा जय झाला. नंतर बाजीराव पळत असतां त्याचे सैन्यावर इंग्रजांनीं आष्ट्यास छापा घातला. त्यांत बापु गोखला मेला. व सातारचा राजा इंग्रजांच्या हातीं लागला.

१८१८ जून तारीख ३–बाजीराव माल्कम साहेबाच्या स्वाधीन झाला. त्यास इंग्रजांनीं ८ लक्ष रुपयांची नेमणूक देऊन ब्रह्मवर्तास पाठविलें. त्रिंबकजी डेंगळ्यास चुनारगडास कैदेंत ठेविलें. सातारच्या सांपडलेल्या प्रतापसिंह राजास गादीवर

बसवून उत्तरेस निरा, पूर्वेस पंढरपूर, दक्षिणेस वारणा, पश्चिमेस सह्याद्री ह्यां मधील मुलूख दिला. व बाकीचा आपले ताब्यांत ठेविला. घोडनदीची छावणी उठविली.

१८३९ प्रतापसिंहावर फितुरीचा दोष शाबीत झाल्यामुळें त्यास गादीवरून काढून त्याचा धाकटा भाऊ शाहाजी हा सातारचे गादीवर बसविला.

१८४८ शाहाजी निपुत्रीक वारला. व दुसरा कोणी वंशांत अधिकारी नव्हता ह्मणून इंग्लिश सरकारानें तें राज्य आपले ताब्यांत घेतलें.

---

## राजांचें वर्णन.

**शिवाजी**—हा मराठी राज्याची स्थापना करणारा होय. ह्याचे ठायीं शौर्य, चातुर्य, समयसूचकता, प्रजेविषयीं दयालुत्व, व स्वधर्मावर निष्ठा, इत्यादि गुण पूर्णपणें वसत होते. ह्यानें केवळ अडाणी लोकांच्या साह्यानें राज्य काबीज केलें. व मुसलमानांच्या जुलमापासून स्वधर्माचें रक्षण केलें. ह्यानें राज्याचे व्यवस्थेकरितां आठ प्रधान नेमिले होते. ते येणेंप्रमाणें— १ पेशवा—यांजकडे मुख्य दिवाणगिरीचें काम. २ पंतअमात्य—जमाबंदी व खर्चाची चौकशी. ३ पंतसचीव—दप्तरदारी व बारनिशी. ४ मंत्री—खासगी शिबंदी व वाकनिशी. ५ सेनापति—सर्व फौजेचें आधिपत्य. ६ सुमंत—पराराजांशीं वकिली. ७ न्यायाधीश—न्याय करणें. ८ पंडितराव— शास्त्रार्थ सांगणें. ह्यास संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते. ते सावत्र बंधु होत.

**संभाजी**—ह्यानें शहाणे प्रधान घालवून कलुशा नांवाचा एक अप्रयोजक प्रधान नेमिला, ह्यामुळें सर्व बंदोबस्त बिघडून बराच मुलूख औरंगजेबाचे ताब्यांत जाऊन आपण त्याचे हातीं लागला. हा कांहींसा शूर, क्रूर, दुर्व्यसनी, व राज्यकारभारास निरुपयोगी असा होता.

**राजाराम**—ह्यानें सातारा येथें आपली गादी स्थापिली. प्रल्हाद निराजीस पंतप्रतिनिधी असा नवा किताब देऊन अष्टप्रधानांत वरिष्ठ केला. हा कांहींसा शूर, मायाळू, दाता व राज्यकारभारास निरुपयोगी असा होता. ह्यास शिवाजी हा एक मुलगा होता.

**शिवाजी**—(राजारामाचा पुत्र) हा गादीवर असतां अल्पवयी होता. यामुळें त्याची आई ताराबाई हीच सर्व व्यवस्था पाहात असे. ह्यास शाहूनें गादीवरून काढिल्यावर त्यांनीं कोल्हापुरास एक स्वतंत्र राज्य स्थापिलें.

**शाहू**—(संभाजीचा पुत्र शिवाजी) हा आपले आईसुद्धां १९ वर्षें नांवाच्या मात्र

कैदेंत होता. ह्यास कैदेंतून सोडण्याचें अवरंगजेबानें मनांत आणून आपल्या पदरच्या एका मोठ्या सरदाराच्या मुलीशीं याचें लग्न करून कांहीं प्रांताची जाहागीर दिली. कैदेंत ह्यास साव ह्मणतां ह्मणतां त्याचें नांव शाहू पडलें. कैदेंतून सुटल्यावर ताराबाईशीं युद्ध करितांना एका बाईनें ह्याचे पायावर मूल टाकिलें; त्याचा सांभाळ करून त्याचें नांव फत्तेसिंग भोंसले असें ठेवून पुढें त्यास अक्कलकोटचा राजा केलें. हा कैदेंतही ऐषआरामांत असल्यामुळें पुढेंही विलासांत निमग्न असे. यास पुत्र नव्हता.

**रामराजा**—हा दत्तक घेतलेला असून परतंत्र होता. यासही संतान नव्हतें.

**दुसरा शाहू**—हा दत्तक घेतलेला असून परतंत्र होता. ह्यास प्रतापसिंह व शाहाजी असे दोन पुत्र होते.

**प्रतापसिंह**—हा सन १८०८ पासून १८१८ पर्यंत पेशव्यांचे कैदेंत साताऱ्यास नांवाचा मात्र राजा होता. पुढील माहिती सन १८१८ व १८३९ ह्यांत पहा.

**शाहाजी**—सन १८३९ व १८४८ पहा.

---

## पेशवे.

**बाळाजी विश्वनाथ**—हा पेशव्यांचा मूळ पुरुष श्रीवर्धनचा कुळकरणी होता. हा धनाजी जाधवाजवळ वसुलाचे कामावर होता व तो वारल्यावर हाच मुख्य झाला. ह्यानें कृष्णराव खटावकर व कान्होजी आंग्र्या ह्यांचें पारिपत्य केल्यामुळें ह्यास शाहूनें पेशवा केला. ह्याचे वेळीं मराठ्यांची सत्ता बरीच वाढली. ह्यास बाजीराव व चिमणाजी आप्पा असे दोन पुत्र होते. हा शहाणा, व दूरदृष्टि असा होता.

**बाजीराव**—ह्यानें मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें करून पुष्कळ मुलूख मिळवून मराठ्यांची सत्ता वाढविली. हा मोठा शूर, राजकीय कामांत निपुण, दृढ निश्चयी व दीर्घ प्रयत्नी असा होता. ह्मणूनच ह्याचेवर शाहूनें सर्व राज्यकारभार सोंपविला होता. ह्यास बाळाजीपंत ( नानासाहेब ), रघुनाथराव, व यवनीपासून झालेला समशेर बहादर असे तीन पुत्र होते.

**बाळाजी बाजीराव**—ह्यानें रघुनाथरावास फौजेचें काम दिलें. व चुलत बंधु सदाशिवराव भाऊ ह्यास राजकीय काम दिलें. ह्यानें प्रजेच्या सुखाविषयीं बरेच उपाय केले. ह्यानें पेशवाईची सनद व आणखी बराच मुलूख मिळविला. ह्याचे वेळीं पुणें ही राजधानी झाली. व मराठ्यांच्या सत्तेचा कळस झाला. परंतु पानपतच्या लढाईत ह्याचा फार नाश झाला, व त्या दुःखानें हा मेला. हा राजकीय कामांत चतुर, कपटी, व चैनी होता. ह्यास माधवराव व नारायणराव असे दोन पुत्र होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

**माधवराव**—हा लहान होता म्हणून [illegible] रघुनाथराव [illegible] पाहात असे. तो त्यास लायक नव्हता; तरी त्यावेळच्या लढायांत पु[illegible] असा होता. म्हणून राज्याचा अर्धा भाग मागूं लागला. तेव्हां पेशव्याचें व ह्याचें वांकडें येऊन पेशव्यानें त्यास व त्याचा स्नेही सखाराम बापू ह्यास कामावरून काढिलें. व त्रिंबकराव मामास कारभारी करून प्रजेच्या संरक्षणार्थ उत्तम कायदे व तजविजी केल्या. रघुनाथराव मोंगलाच्या आश्रयानें लढाईस आला असतां चातुर्यानें व आर्जवानें लढाई टाळून त्यास वश केलें परंतु तो बिथरल्यामुळें त्यावर हल्ला करून त्यास प्रतिबंधांत ठेविलें. रामशास्त्री प्रभुणें ह्या महाविद्वान व निःपक्षपाती ब्राह्मणास न्यायाचें काम दिलें. ह्याचेवेळीं म्हैसुरांत हैदरअल्ली स्वतंत्र राज्य स्थापून मराठ्यांचा शत्रु झाला. परंतु त्याचा पराभव करून त्यास खंडणी देण्यास भाग पाडिलें. हा शूर, धैर्यवान, प्रजेविषयीं कनवाळू, चतूर, राजनीतींत दक्ष, प्रामाणिक, असा होता. हा निपुत्रिक वारला.

**नारायणराव**—हा गादीवर बसल्यावेळीं माधवरावाच्या सांगण्यावरून ह्याचें व रघुनाथरावाचें एकमत होतें. तरी कांहीं दिवशीं वैमनस्य येऊन पेशव्यानें रघुनाथरावास कारभारावरून काढून प्रतिबंधांत ठेविलें. व बजाबा पुरंदरे, नाना फडनवीस, व हरिपंत फडके ह्यांच्या हातून कारभार चालविला. म्हणून पुढें रघुनाथरावानें मारेकरी घालून पेशव्यास ठार मारविलें. तेव्हां त्याची बायको गंगाबाई ही गरोदर होती. तिला पुढें सवाई माधवराव हा पुत्र झाला.

**रघुनाथराव**—हा हैदराशीं लढाईस गेला असतां मागें कारभाऱ्यांनीं ह्याचे पक्षाचे सर्व लोक कैद करून नारायणरावाची बायको गंगाबाई हिचे नांवानें सर्व राज्यकारभार चालविला. हा मोठा पराक्रमी, शूर, कपटी व राज्यकारभारास निरुपयोगी असा होता. ह्यास बाजीराव व चिमणाजी आपा हे औरस व अमृतराव दत्तक असे तीन पुत्र होते.

**सवाई माधवराव**—हा नांवाचा मात्र पेशवा असे. सर्व कारभार नाना फडनवीस करीत असे. हा पेशवा होतांच रघुनाथरावानें इंग्रजांस साष्टी बेट वगैरे देण्याचें कबूल करून त्यांच्या मदतीनें राज्य मिळविण्याचा बेत आणिला. परंतु पुरंदरचा तह झाल्यामुळें त्यांनीं राघोबादादाचा पक्ष सोडिला. ह्याचेवेळीं टिपू व निजाम यांचा बंदोबस्त होऊन बराच मुलूख मिळाला. व दिल्लीचे बादशाहाकडून 'वकील मुतलख' ही पदवी मिळाली. पुढें हा नानाचे प्रतिबंधास कंटाळून आत्महत्या करून मरण पावला. हा निपुत्रीक होता.

कैदेंत होता. ह्यास कैदेंतून सोडण्याचें अवरंगजेबानें मनांत आणून आपल्या पदरच्या एका मोठ्या सरदाराच्या मुलीशीं याचें लग्न करून कांहीं प्रांताची जाहागीर दिली. कैदेंत ह्यास साव ह्मणतां ह्मणतां त्याचें नांव शाहू पडलें. कैदेंतून सुटल्यावर ताराबाईशीं युद्ध करितांना एका बाईनें ह्याचे पायावर मूल टाकिलें; त्याचा सांभाळ करून त्याचें नांव फत्तेसिंग भोंसले असें ठेवून पुढें त्यास अक्कलकोटचा राजा केलें. हा कैदेंतही ऐषआरामांत असल्यामुळें पुढेंही विलासांत निमग्न असे. यास पुत्र नव्हता.

**रामराजा**—हा दत्तक घेतलेला असून परतंत्र होता. यासही संतान नव्हतें.

**दुसरा शाहू**—हा दत्तक घेतलेला असून परतंत्र होता. ह्यास प्रतापसिंह व शाहाजी असे दोन पुत्र होते.

**प्रतापसिंह**—हा सन १८०८ पासून १८१८ पर्यंत पेशव्यांचे कैदेंत साताऱ्यास नांवाचा मात्र राजा होता. पुढील माहिती सन १८१८ व १८३९ ह्यांत पहा.

**शाहाजी**—सन १८३९ व १८४८ पहा.

---

## पेशवे.

**बाळाजी विश्वनाथ**—हा पेशव्यांचा मूळ पुरुष श्रीवर्धनचा कुळकरणी होता. हा धनाजी जाधवाजवळ वसुलाचे कामावर होता व तो वारल्यावर हाच मुख्य झाला. ह्यानें कृष्णराव खटावकर व कान्होजी आंग्र्या ह्यांचें पारिपत्य केल्यामुळें ह्यास शाहूनें पेशवा केला. ह्याचे वेळीं मराठ्यांची सत्ता बरीच वाढली. ह्यास बाजीराव व चिमणाजी आप्पा असे दोन पुत्र होते. हा शहाणा, व दूरदृष्टि असा होता.

**बाजीराव**—ह्यानें मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें करून पुष्कळ मुलूख मिळवून मराठ्यांची सत्ता वाढविली. हा मोठा शूर, राजकीय कामांत निपुण, दृढ निश्चयी व दीर्घ प्रयत्नी असा होता. ह्मणूनच ह्याचेवर शाहूनें सर्व राज्यकारभार सोंपविला होता. ह्यास बाळाजीपंत ( नानासाहेब ), रघुनाथराव, व यवनीपासून झालेला समशेर बहादर असे तीन पुत्र होते.

**बाळाजी बाजीराव**—ह्यानें रघुनाथरावास फौजेचें काम दिलें. व चुलत बंधु सदाशिवराव भाऊ ह्यास राजकीय काम दिलें. ह्यानें प्रजेच्या सुखाविषयीं बरेच उपाय केले. ह्यानें पेशवाईची सनद व आणखी बराच मुलूख मिळविला. ह्याचे वेळीं पुणें ही राजधानी झाली. व मराठ्यांच्या सत्तेचा कळस झाला. परंतु पानपतच्या लढाईंत ह्याचा फार नाश झाला. व त्या दुःखानें हा मेला. हा राजकीय कामांत चतुर, कपटी, व चैनी होता. ह्यास माधवराव व नारायणराव असे दोन पुत्र होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

**माधवराव**— हा लहान होता झणून [illegible] रघुनाथराव व [illegible] असे. तो त्यास लायक नव्हता; तरी त्यावेळच्या लढायांत पुढें [illegible] असा होता. झणून राज्याचा अर्धा भाग मागूं लागला. तेव्हां पेशव्याचें [illegible] ह्याचें वांकडें येऊन पेशव्यानें त्यास व त्याचा स्नेही सखाराम बापू ह्यास कामावरून काढिलें. व त्रिंबकराव मामास कारभारी करून प्रजेच्या संरक्षणार्थ उत्तम कायदे व तजविजी केल्या. रघुनाथराव मोंगलाच्या आश्रयानें लढाईस आला असतां चातुर्यानें व आर्जवानें लढाई टाळून त्यास वश केलें परंतु तो बिथरल्यामुळें त्यावर हल्ला करून त्यास प्रतिबंधांत ठेविलें. रामशास्त्री प्रभुणें ह्या महाविद्वान व निःपक्षपाती ब्राह्मणास न्यायाचें काम दिलें. ह्याचेवेळीं ह्मैसुरांत हैदरअल्ली स्वतंत्र राज्य स्थापून मराठ्यांचा शत्रु झाला. परंतु त्याचा पराभव करून त्यास खंडणी देण्यास भाग पाडिलें. हा शूर, धैर्यवान, प्रजेविषयीं कनवाळू, चतूर, राजनीतींत दक्ष, प्रामाणिक, असा होता. हा निपुत्रिक वारला.

**नारायणराव**—हा गादीवर बसल्यावेळीं माधवरावाच्या सांगण्यावरून ह्याचें व रघुनाथरावाचें एकमत होतें. तरी कांहीं दिवशीं वैमनस्य येऊन पेशव्यानें रघुनाथरावास कारभारावरून काढून प्रतिबंधांत ठेविलें. व बजाबा पुरंदरे, नाना फडनवीस, व हरिपंत फडके ह्यांच्या हातून कारभार चालविला. झणून पुढें रघुनाथरावानें मारेकरी घालून पेशव्यास ठार मारविलें. तेव्हां त्याची बायको गंगाबाई ही गरोदर होती. तिला पुढें सवाई माधवराव हा पुत्र झाला.

**रघुनाथराव**— हा हैदराशीं लढाईस गेला असतां मागें कारभाऱ्यांनीं ह्याचे पक्षाचे सर्व लोक कैद करून नारायणरावाची बायको गंगाबाई हिचे नांवानें सर्व राज्यकारभार चालविला. हा मोठा पराक्रमी, शूर, कपटी व राज्यकारभारास निरुपयोगी असा होता. ह्यास बाजीराव व चिमणाजी आपा हे औरस व अमृतराव दत्तक असे तीन पुत्र होते.

**सवाई माधवराव**— हा नांवाचा मात्र पेशवा असे. सर्व कारभार नाना फडनवीस करीत असे. हा पेशवा होतांच रघुनाथरावानें इंग्रजांस साष्टी बेट वगैरे देण्याचें कबूल करून त्यांच्या मदतीनें राज्य मिळविण्याचा बेत आणिला. परंतु पुरंदरचा तह झाल्यामुळें त्यांनीं राघोबादादाचा पक्ष सोडिला. ह्याचेवेळीं टिपू व निजाम यांचा बंदोबस्त होऊन बराच मुलूख मिळाला. व दिल्लीचे बादशाहाकडून 'वकील मुतलख' ही पदवी मिळाली. पुढें हा नानाचे प्रतिबंधास कंटाळून आत्महत्या करून मरण पावला. हा निपुत्रीक होता.

**चिमणाजी आप्पा**–सन १७९६ पहा.

**दुसरा बाजीराव**–ह्यानें पेशव्यांचे नांवावर पाणी भोतून राज्यसत्ता घालविली. नाना फडनविसास कैदेंत ठेवून पुणें लुटविलें. व शिंद्यानें नानास सोडिल्यावर त्यास पुन: कारभारी केलें. परंतु तो लवकरच मेला. व ह्यास इंग्लिशांनीं गादी दिली असतां त्यांच्याशीं कृतघ्नपणानें वागल्यामुळें पुन्हाही गादीस मुकला. हा मूर्ख, भित्रा, विलासी, दुराचरणी असा होता.

**विनायकराव**–सन १८०३ पहा.

---

## प्रसिद्ध पुरुषांची हकीकत.

**शिरके**–हे ब्राह्मणी राज्याच्या कारकीर्दींत कोंकणांत प्रसिद्ध सरदार होते. त्यांनीं मात्र मुसलमानांशीं लढाया करून आपलें रक्षण केलें.

**चांदबिबी**–ही स्त्री अहमदनगरच्या बादशाहाची कोणी नातलग होती. तिनें तें शहर राखण्याकरितां विलक्षण पराक्रम करून शेवटीं ती मारेकऱ्यांच्या हातून मारली गेली.

**मलिकंबर**–अहमदनगरच्या राज्यांत एक बुद्धिमान प्रधान होता. ह्यानेंच तें राज्य व तेथील बादशाही, अकबराचे ताब्यांत गेलीं असतांही दौलताबादेजवळ खिडकी ( अवरंगाबाद ) शहराची स्थापना करून दुसरा नवाच बादशाहा करून ती निजामशाही राज्याची राजधानी केली. व ताब्यांत न गेलेला मुलूख राखिला. ह्यानें वसूल घेण्याचे वगैरे उत्तम नियम केले.

**भोंसले**–हे शिवाजीचे पूर्वज. ह्यांचें मूळ गांव दौलताबादेजवळचें वेरूळ. ह्यांच्यापैकींच शिवाजीचा आजा मालोजी भोंसले हा शिंदकेरच्या जाधवरावाच्या आश्रयानें निजामशाहींत चाकरीस राहिला. व त्या रावाचीच कन्या आपले मुलास ( शाहाजीस ) बायको केली. म्हणून त्याची योग्यता वाढून निजामशाहींतून त्यास जाहागिर मिळाली. बापाच्या मागें शाहाजी निजामशाहींतच चाकरीस होता, पण तें राज्य शाहाजहानानें बुडविल्यामुळें त्याचे चाकरीस राहिला. पुढें ह्यास दिलेल्या इनामापैकीं कांहीं परत घेतल्यामुळें त्याची चाकरी सोडून विजापूरकरांची चाकरी मरेपर्यंत केली. शाहाजीची पहिली बायको जाधवरावाची कन्या हिजपासून शिवाजी झाला. दुसरी बायको मोहित्यांची कन्या हिचेपासून व्यंकोजी झाला.

**दादोजी कोंडदेव**–हा शाहाजीचा मोठा विश्वासू व बहुगुणी कारभारी

होता. ह्मणूनच त्याचेजवळ शाहाजीनें शिवाजीस ठेविलें होतें व ह्याच्या शिक्षणानेंच शिवाजीचे अंगीं उत्तम गुण आले.

**आबाजी सोनदेव**— ह्यास शिवाजीनें पंतअमात्य केलें. ह्याच्या वंशांतील पुरुषांनीं साताऱ्याचे राज्याचे अखेरी पर्यंत पंतअमात्याचें काम केलें.

**हंबीरराव मोहिते**— हा प्रथम पांच हजार स्वारांचा मुख्य होता. परंतु ह्यानें मोठा पराक्रम केल्यामुळें ह्यास शिवाजीनें सेनापति केलें. ह्याच्या वंशांतील पुरुषांनीं साताऱ्च्या राज्याच्या अखेरी पर्यंत तेथील स्वारांचा मुख्य अधिकार अनुभविला.

**मुधोळकर घोरपडे**— शिवाजीचे वेळीं विजापूरकरांचा हा एक सरदार होता.

**येसाजी कंक**—
**तानाजी मालुसरा**—
**बाजी फसलकर**—
हे मावळे लोकांचे मुख्य असून मोठे शूर व विश्वासू असे शिवाजीचे जिवलग मित्र होते.

**प्रल्हाद निराजी**— हा फार शहाणा ब्राह्मण होता. ह्यानें मराठी राज्याचीं मोठमोठीं कामें करून राज्य बुडत असतां राज्याचा बचाव केला. व राज्यव्यवस्थेसाठीं शहाणपणाचे उपाय योजिले. ह्मणूनच ह्यास पंतप्रतिनिधी असा किताब राजारामानें दिला.

**संताजी घोरपडे**— ह्यानें राज्य बुडत असतां मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. त्याचे सन्मानाची खूण ह्मणून ह्यास राजारामानें जरिपटका दिला.

**धनाजी जाधव**—
**खंडेराव दाभाडे**—
ह्या प्रतापी सरदारांच्या पराक्रमामुळें अवरंगजेबाच्या हातून मराठी राज्य बचावलें.

**आबाजी पुरंदरे**— हा सासवडचा कुळकर्णी व हल्लींच्या पुरंदऱ्यांचा मूळपुरुष. हा धनाजी जाधवाजवळ वसुलाचे कामावर होता व पुढें शाहूनें ह्यासच बाळाजी विश्वनाथाचें मुतालीक केलें.

**मल्हारजी होळकर**— हा हल्लींच्या होळकराचा मूळपुरुष; व निरानदीच्या कांठच्या होळ खेड्याचा चौगुला. हा बाजीरावाजवळ शिलेदार असे. हा फक्त माळव्यांतील वगैरे स्वाऱ्यांत केलेल्या पराक्रमानेंच मोठ्या योग्यतेस चढला.

**राणोजी शिंदा**— हा हल्लींच्या शिंद्याचा मूळपुरुष. ह्याचे पूर्वज साताऱ्याजवळच्या कन्हेरखेड्याचे पाटील होते. परंतु ह्याच्या पूर्वजांनीं व ह्यानेंही मोंगलांच्या पदरीं सरदारी करून मोठी अब्रू मिळविली होती. पुढें नशीबानें ह्यास गरीबी आ-

**चिमणाजी आप्पा**–सन १७९६ पहा.

**दुसरा बाजीराव**–ह्यानें पेशव्यांचे नांवावर पाणी ओतून राज्यसत्ता घालविली. नाना फडनविसास कैदेंत ठेवून पुणें लुटविलें. व शिंद्यानें नानास सोडिल्यावर त्यास पुन: कारभारी केलें. परंतु तो लवकरच मेला. व ह्यास इंग्लिशांनीं गादी दिली असतां त्यांच्याशीं कृतघ्नपणानें वागल्यामुळें पुन्हाही गादीस मुकला. हा मूर्ख, भित्रा, विलासी, दुराचरणी असा होता.

**विनायकराव**–सन १८०३ पहा.

---

## प्रसिद्ध पुरुषांची हकीकत.

**शिरके**–हे ब्राह्मणी राज्याच्या कारकीर्दींत कोंकणांत प्रसिद्ध सरदार होते. त्यांनीं मात्र मुसलमानांशीं लढाया करून आपलें रक्षण केलें.

**चांदबिबी**–ही स्त्री अहमदनगरच्या बादशाहाची कोणी नातलग होती. तिनें तें शहर राखण्याकरितां विलक्षण पराक्रम करून शेवटीं ती मारेकऱ्यांच्या हातून मारली गेली.

**मलिकंबर**–अहमदनगरच्या राज्यांत एक बुद्धिमान प्रधान होता. ह्यानेंच तें राज्य व तेथील बादशाही, अकबराचे ताब्यांत गेलीं असतांही दौलताबादेजवळ खिडकी ( अवरंगाबाद ) शहराची स्थापना करून दुसरा नवाच बादशाहा करून ती निजामशाही राज्याची राजधानी केली. व ताब्यांत न गेलेला मुलूख राखिला. ह्यानें वसूल घेण्याचे वगैरे उत्तम नियम केले.

**भोंसले**–हे शिवाजीचे पूर्वज. ह्यांचें मूळ गांव दौलताबादेजवळचें वेरूळ. ह्यांच्यापैकींच शिवाजीचा आजा मालोजी भोंसले हा शिंदकेरच्या जाधवरावाच्या आश्रयानें निजामशाहींत चाकरीस राहिला. व त्या रावाचीच कन्या आपले मुलास ( शाहाजीस ) बायको केली. म्हणून त्याची योग्यता वाढून निजामशाहींतून त्यास जाहागिर मिळाली. बापाच्या मागें शाहाजी निजामशाहींतच चाकरीस होता. पण तें राज्य शाहाजहानानें बुडविल्यामुळें त्याचे चाकरीस राहिला. पुढें ह्यास दिलेल्या इनामापैकीं कांहीं परत घेतल्यामुळें त्याची चाकरी सोडून विजापूरकरांची चाकरी मरेपर्यंत केली. शाहाजीची पहिली बायको जाधवरावाची कन्या हिजपासून शिवाजी झाला. दुसरी बायको मोहित्यांची कन्या हिचेपासून व्यंकोजी झाला.

**दादोजी कोंडदेव**–हा शाहाजीचा मोठा विश्वासू व बहुगुणी कारभारी

होता. म्हणूनच त्याचेजवळ शाहाजीनें शिवाजीस ठेविलें होतें व ह्याच्या शिक्षणानेंच शिवाजीचे आंगीं उत्तम गुण आले.

**आबाजी सोनदेव**— ह्यास शिवाजीनें पंतअमात्य केलें. ह्याच्या वंशांतील पुरुषांनीं साताऱ्याचे राज्याचे अखेरी पर्यंत पंतअमात्याचें काम केलें.

**हंबीरराव मोहिते**— हा प्रथम पांच हजार स्वारांचा मुख्य होता. परंतु ह्यानें मोठा पराक्रम केल्यामुळें ह्यास शिवाजीनें सेनापति केलें. ह्याच्या वंशांतील पुरुषांनीं साताऱ्याच्या राज्याच्या अखेरी पर्यंत तेथील स्वारांचा मुख्य अधिकार अनुभविला.

**मुधोळकर घोरपडे**— शिवाजीचे वेळीं विजापूरकरांचा हा एक सरदार होता.

**येसाजी कंक**—<br>**तानाजी मालुसरा**—<br>**बाजी फसलकर**— } हे मावळे लोकांचे मुख्य असून मोठे शूर व विश्वासू असे शिवाजीचे जिवलग मित्र होते.

**प्रल्हाद निराजी**— हा फार शहाणा ब्राह्मण होता. ह्यानें मराठी राज्याचीं मोठमोठीं कामें करून राज्य बुडत असतां राज्याचा बचाव केला. व राज्यव्यवस्थेसाठीं शहाणपणाचे उपाय योजिले. म्हणूनच ह्यास पंतप्रतिनिधी असा किताब राजारामानें दिला.

**संताजी घोरपडे**— ह्यानें राज्य बुडत असतां मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. त्याचे सन्मानाची खूण म्हणून ह्यास राजारामानें जरिपटका दिला.

**धनाजी जाधव**—<br>**खंडेराव दाभाडे**— } ह्या प्रतापी सरदारांच्या पराक्रमामुळें अवरंगजेबाच्या हातून मराठी राज्य बचावलें.

**आबाजी पुरंदरे**— हा सासवडचा कुळकर्णी व हल्लींच्या पुरंदऱ्यांचा मूळपुरुष. हा धनाजी जाधवाजवळ वसुलाचे कामावर होता व पुढें शाहूनें ह्यासच बाळाजी विश्वनाथाचें मुतालीक केलें.

**मल्हारजी होळकर**— हा हल्लींच्या होळकराचा मूळपुरुष; व निरानदीच्या कांठच्या होळ खेड्याचा चौगुला. हा बाजीरावाजवळ शिलेदार असे. हा फक्त माळव्यांतील वगैरे स्वाऱ्यांत केलेल्या पराक्रमानेंच मोठ्या योग्यतेस चढला.

**राणोजी शिंदा**— हा हल्लींच्या शिंद्याचा मूळपुरुष. ह्याचे पूर्वज साताऱ्याजवळच्या कन्हेरखेड्याचे पाटील होते. परंतु ह्याच्या पूर्वजांनीं व ह्यानेंही मोंगलांच्या पदरीं सरदारी करून मोठी अब्रू मिळविली होती. पुढें नशीबानें ह्यास गरीबी आ-

त्यामुळें बाजीरावाजवळ बारगीर व हुजऱ्या होता. परंतु माळव्याचे स्वाऱ्यांतील परा-क्रम व उत्तम गुण ह्यांचे योगानें योग्यतेस चढला.

**दमाजी गाईकवाड**— हा खंडेराव दाभाड्याच्या हाताखालीं हलका सरदार होता. परंतु ह्याच्या विलक्षण शौर्यामुळें ह्यास समशेर बाहदर ही पदवी व मोठा अ-धिकार मिळून योग्यतेस चढला.

**परसोजी भोंसला**— नागपूरच्या भोंसल्यांचा मूळपुरुष. हा बाजीरावाचे कारकीर्दींत कांहींसा प्रसिद्धीस आला होता.

**रघोजी भोंसला**— हा शिकारीचे कामांत हुशार व धीट होता. ह्मणून ह्या-चेवर शाहूची मर्जी बसून त्यानें ह्यास आपली मेहुणी ( शिरक्यांची कन्या ) देवविली. आणि सेनासाहेब सुभा हा किताब देऊन वऱ्हाड प्रांताची सुभेदारी दिली.

**चिमणाजी आपा**— ह्यानें वसईच्या लढाईंत पोर्तुगिजांचा मोठ्या पराक्रमानें पराभव केला. हा मोठा शूर, नीतिमान् व शहाणा होता. ह्याचे मुलाचें नांव सदाशिवराव.

**सदाशिवराव**— हा राजकीय कामांत चतूर, शूर व शहाणा होता. ह्यानें रामचंद्र बाबा शेणवयाचे मदतीनें मुलखाचा चांगला बंदोबस्त केला व प्रजेस सुख दिलें. पुढें खर्चाच्या संबंधानें ह्याचें व रघुनाथरावाचें भांडण होऊन, ह्याचेकडे फौ-जेचें काम आलें. ह्यानें उदगीरचे लढाईंत मोंगलांचा पराभव केला. परंतु ह्या गर्वानें पुढें युक्तीनें युद्ध न केल्यामुळें पानपतचे लढाईंत पराभव पावून नाहींसा झाला.

**नाना फडनवीस**— हा लहान वयांत राज्यकारभार करूं लागल्यामुळें त्यांत इतका प्रवीण होता कीं, ह्याची बरोबरी दुसऱ्याच्यानें होणारच नाहीं. हा चतूर, प्रामाणिक, स्मरणशक्तीचा धड व शहाणा असा होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.